**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २८ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **आगामी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी मातीच्या स्थानिक मूर्ती खरेदी करण्याचं पंतप्रधानांचं 'मन की बात' मधून आवाहन.**
2. **देशव्यापी पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेत राज्याचा सहभाग.**
3. **नांदगाव - चांदुर रेल्वे दरम्यान समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील ५ प्रवाशांचा मृत्यू.**
4. **आज वाशिम, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा.**
5. 

**आता सविस्तर बातम्या .......**

मन कि बात

मातीच्या मूर्ती पाण्यात सहजपणे विरघळत असल्यानं आपले जलस्त्रोत आणि पर्यावरणाचं रक्षण होतं, आणि त्यासोबतच आपली श्रद्धाही टिकून राहते त्यामुळे आगामी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनलेल्या मूर्ती खरेदी करू नयेत असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आजच्या मन की बात मधून केलं.

गणपतीची मूर्ती खरेदी करताना स्थानिक मूर्तिकारांनी तयार केलेल्या मूर्ती खरेदी करून व्होकल फॉर लोकलचा संकल्प अधिक दृढ करावा असं आवाहनही त्यांनी या निमित्तानं केलं. सध्या सुरु असलेल्या पावसाच्या हंगामात कॅच द रेन या अभियानाअंतर्गत पावसाचा प्रत्येक थेंब वाचवण्याचं महत्व देखील त्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरील 'मन की बात' मधून देशवासियांशी संवाद साधला. देशबांधवांच्या अनेक कामगिरींवर चर्चा करतांना त्यांनी राष्ट्राची सुरक्षा आणि आत्मनिर्भरतेशी जोडलेल्या यशाचा गौरवपूर्ण उल्लेख

केला. आयएनएस दूनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय या संपूर्ण भारतीय बनावटीच्या जहाजांचा त्यांनी कौतुकास्पद उल्लेख केला. डी आर डी ओच्या संशोधन कार्याचा कौतुकास्पद उल्लेख त्यांनी केला आणि समुद्रापासून आकाशापर्यंत आपला भारत अधिक सुरक्षित तसंच आत्मनिर्भर होत असल्याचं नमूद केलं. 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' आणि अहमदाबादच्या 'जागतिक योगासन स्पर्धे'विषयी त्यांनी चर्चा केली. राष्ट्रउभारणीतली लोकसहभागाची ही ताकद भारताची सर्वात मोठी संपत्ती आहे असं पंतप्रधान म्हणाले. महाराष्ट्रातील नांदेडच्या बहादूरपुरा गावातील पेठकर कुटुंबाचा अभिमानास्पद उल्लेख करून पंतप्रधान म्हणाले की, या कुटुंबाने घरी झालेल्या लग्नाच्या निमित्तानं, गावातल्या सुमारे साडेतीन हजार लोकांसाठी अपघात विम्याची व्यवस्था केली.

सरकार देशभरातल्या कोट्यवधी कुटुंबांना सुरक्षा कवच पुरवत असून, विविध सरकारी योजनांबद्दलची माहिती कुटुंबांपर्यंत पोहचविण्याचं आवाहन त्यांनी देशवासियांना केलं. अंधश्रद्धेत बुडालेले लोक तर्क आणि सत्य जाणून न घेता असे निर्णय घेऊ लागतात ज्यामुळे मोठं नुकसान होतं, असं सांगून पंतप्रधानांनी आसाममधील 'हरगिला' या दुर्मिळ पक्ष्याच्या संवर्धनाच्या प्रवासाचा उल्लेख केला. नागालँडची 'नागालँड बेबी लीग' आणि 'नागालँड वीमेन फुटसाल लीग' या उपक्रमांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. नालंदा विद्यापीठाचा शास्त्रार्थाची प्राचीन परंपरा जिवंत करण्याचा उपक्रम, दिल्लीतली सेंट्रल संस्कृत युनिव्हर्सिटीचे नवे अभ्यासक्रम 'ब्रह्मकमळ डोमिनिकाना' हे अभियान, मेघालयातले रूट ब्रिज, आणि मध्य प्रदेशातल्या राजगढ जिल्ह्यामधल्या ब्यावरा इथं प्लास्टिक कचरा हटविणाऱ्या बहिणींच्या प्रयत्नांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

पुरस्कार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'गार्डियन ऑफ द ब्ल्यू होरायझन' हा सेशेल्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला. मोदी यांना इतर देशाकडून मिळालेला हा ३४ वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे. पंतप्रधानांनी हा पुरस्कार हवामान बदलाच्या आव्हानांविरोधात लढणाऱ्यांना समर्पित केला.

प्लस पोलिओ

आज देशभरात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत राज्यात सर्वत्र पाच वर्षांपर्यंतच्या बालकांचं लसीकरण केलं जात आहे. एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हास्तरावर प्रशासनानं व्यापक नियोजन केलं आहे. पोलिओ लस देण्याकरिता ठिकठिकाणी बूथ उभारले असून ट्रांझिट बूथ, फिरती पथकंही कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसंच संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी विविध पातळ्यांवर पर्यवेक्षकांच्याही नेमणूका करण्यात आल्या आहेत. **नागपूर** महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ आज सकाळी लकडगंज झोन अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, हिवरी नगर इथं करण्यात आला. या कार्यक्रमास महापौर निता ठाकरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त भारताचा संकल्प यावेळी करण्यात आला. **यवतमाळ** जिल्ह्यात आरोग्य विभागातर्फे लासीना येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सुभाष ढोले यांनी या मोहिमेचे उद्घाटन केलं. जिल्द्यात दोन लाख पाच हजार एकशे सत्तावीस बालकांना पोलिओ लस देण्या साठी व्यापक नियोजन करण्यात आलं . दुर्गम आणि तात्पुरत्या वस्त्यांसाठी दीडशे मोबाइल टीम्स कार्यरत असून, प्रवासात असलेली मुलंही लसीकरणापासून वंचित राहू नयेत म्हणून ३४ फिरती पथकंही सज्ज करण्यात आली होती. **गडचिरोली** इथं आमदार डॉ. मिलिंद नरोटे आणि नगराध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर यांच्या हस्ते मोहिमेचं उद्घाटन झालं. तर **वाशिम** जिल्ह्यातील ९९६ बुथवर २ हजार ४७४ कर्मचाऱ्यांच्या मार्फत ५ वर्षांखालील १ लाख ५९३ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्याचं नियोजन करण्यात आलं.

मनपा अर्थ संकल्प/टीका

नागपूर महानगरपालिकेने सादर केलेला २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा ६,२०२ कोटी ४८ लाखांचा अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ असून, यात सामान्य नागपूरकरांच्या मूलभूत समस्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे, अशी टीका माजी मंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केली. महापालिकेच्या स्थायी समिती सभापतींनी काल सादर केलेल्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना राऊत यांनी सत्ताधारी भाजपवर जोरदार निशाणा साधला. स्वतःची उत्पन्न साधने निर्माण करण्यात सत्ताधारी पूर्णपणे अपयशी ठरले आहेत

शहराच्या तिजोरीत खडखडाट असताना ‘डक्टिंग पॉलिसी’सारख्या घोषणा केवळ मलमपट्टी करण्याचे काम करत आहेत, असं डॉ. राऊत म्हणाले. गेल्या काही वर्षांत शहरातील रस्ते, पथदिवे आणि स्वच्छतेची जी दुरवस्था झाली आहे, त्यावर या बजेटमध्ये कोणतीही ठोस तरतूद नाही. केवळ ‘पब्लिसिटी स्टंट’ म्हणून काही योजना पुढे केल्या जात आहेत, असा आरोप डॉ. राऊत यांनी केला.

अपघात

समृद्धी महामार्गाने चंद्रपूर वरून अकोल्याकडे जाणाऱ्या कार क्रमांक एम एच 34 बीएफ 1346 ने एका ट्रकला मागच्या बाजूने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात कार मधील पाचही प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आमच्या वार्ताहराने दिली आहे. जिवणे कुटुंबातील भास्कर , रमेश, लता , आरती आणि त्रिशा अशी मृतांची नावे असून लोकेशन क्रमांक 105 नांदगाव आणि चांदुर रेल्वेच्या दरम्यान आज सकाळी साडे अकरा वाजताच्या सुमारास हा अपघात झाला.

पश्चिम आशिया

अमेरिका आणि इराण यांच्यातला युद्धविराम फिसकटल्यानं पश्चिम आशियातली सुरक्षा स्थिती पुन्हा एकदा बिकट झाली आहे. गेल्या काही तासांमध्ये दोन्ही बाजूंनी एकमेकांवर लष्करी हल्ले केले. इराणनं आपल्या व्यापारी तेलवाहू जहाजावर ड्रोन हल्ला केल्याचा आरोप करत अमेरिकेनंही होर्मुझ सामुद्रधुनीजवळ इराणच्या दहा लष्करी ठाण्यांवर हल्ला केला. त्यानंतर इराणनं कुवेत आणि बहारीन मधल्या अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र डागली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कडक शब्दांत इशारा दिला आहे. युध्दविरामाचं आणखी उल्लंघन केलं तर मोठं लष्करी प्रत्युत्तर दिलं जाईल, असं ते म्हणाले.

फार्मर कप

पाणी फाऊंडेशन मार्फत 2022 पासून 'सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा' महाराष्ट्रात 46 तालुक्यात सुरू आहे. विविध टप्प्यात शेतक-यांसाठी काम करत असलेल्या 'सत्यमेव जयते फार्मर कप 2026' चा शुभारंभ उद्या मुंबईत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. फडणवीस यांनी 23 मार्च 2025 रोजी फार्मर कप उपक्रमाचा संपूर्ण महाराष्ट्रात 351 तालुक्यात विस्तार करावा अशा सूचना दिल्या होत्या.

त्यांनतर महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग, ग्रामविकास मधील महिलांच्या उपजीविकेसाठी काम करणारी उमेद आणि पाणी फाऊंडेशन यांच्या सहभागातून शेतकऱ्यासाठी जनचळवळ उभी करण्यासाठी एकत्र विविध टप्प्यावर कार्यवाही सुरू आहे.

हवामान

विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात पावसाने दखल दिलेली आहे. मागील 24 तासांत यवतमाळ इथं 68 मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्या पाठोपाठ नागपुरातील भिवापूर इथं 59, बुलढाण्यात मेहकर इथं 54 पूर्णांक 1 तर अकोल्यात 50 पूर्णांक 8 दशांश मिलीमीटर इतक्या पावसाची नोंद झाली. आज वाशिम, यवतमाळ आणि चंद्रपूर इथं मुसळधार पावसाचा अंदाज असून हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर उद्या अमरावती जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. दरम्यान येत्या काही तासांत विदर्भातील बहुतांश ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

*****